बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक
बाल विकास सेवा योजना प्रकल्प नगर-01
ता.नगर या पदाचा अतिरिक्त कार्यभार
सोपविणे बाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
महिला व बाल विकास विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रं.मबाक/कार्या-1/239/2025
अहिल्यानगर दिनांक -01 /04/2025

वाचा:- 1) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रं. मबाआ/2015 /प्रकं-90/का-7 अ दि.28 मे 2015.
2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम 1961 चा नियम 95(2)(क)3(क)
3) या कार्यालयाकडील आदेश क्र.जा.क्र कार्या-3/464/2024 दि.04/09/2024

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नगर-01, ता.नगर येथिल रिक्त बाल विकास प्रकल्प अधिकारी, या पदाचा अतिरिक्त कार्यभार संदर्भ क्र. 3 अन्वये श्रीम.रंजना बाळासाहेब कार्ले, पर्यवेक्षिका बीट – वाळकी यांचेकडे अतिरिक्त कार्यभार म्हणुन सोपविण्यात आलेला आहे.

दरम्यान बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, नगर-02 या पदावर श्री.दिपक पिराजी मेहत्रे (वर्ग-2) हे बदलीने हजर झाल्याने संदर्भ क्र. 1 च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नगर-01, या पदाचा अतिरिक्त कार्यभार यापुढे श्री.दिपक पिराजी मेहत्रे बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नगर-02, यांचेकडे अतिरिक्त कार्यभार म्हणुन या आदेशान्वये सोपविण्यात येत आहे.सबब श्री.दिपक पिराजी मेहत्रे, यांनी त्यांचे मुळ पदाचे कामकाज संभाळुन अतिरिक्त कामकाज तात्काळ सुरु करावे. सदरचा आदेश पुढील आदेश होईपर्यत लागु राहिल.

सदरचा आदेश जिल्हा परिषद अहिल्यानगर च्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे ज्याचा सांकेतांक क्रमांक 202504010800005 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 01-04-2025 14:41:10

आशिष येरेकर (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

1. श्रीम.रंजना बाळासाहेब कार्ले ए.बा.वि.से.यो. प्रकल्प नगर-01
2. श्री.दिपक पिराजी मेहत्रे बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो.प्रकल्प नगर-02

प्रत:- माहितीस्तव रवाना.

1. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर